ISSN: 0030-5324
M.S. University of Baroda

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० (NEP – 2020)

**डॉ. महादू एम. बागुल**
**मराठी विभाग प्रमुख**
**मामासाहेब मोहोळ कॉलेज, पौड रोड, पुणे-३८**

## प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून चा शिक्षणात क्षेत्रातला हा तिसऱ्यांदा मोठा बदल करण्यात आलेला आहे व्यक्तीचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर एकमेव उपाय म्हणजे त्या व्यक्तीला दिले जाणारे दर्जेदार गुणवत्ता पूर्ण शिक्षण होय.१)१९६८ मध्ये पहिले शैक्षणिक धोरण २)१९८६ दुसरे शैक्षणिक धोरण ३) २०२० तिसरे शैक्षणिक धोरण १९९२ मध्ये किरकोळ बदल केले २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा आला,२०१३मध्ये शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी झाली.३१ मे २०१९ मध्ये के.कस्तुरीरंगन कमिटीने आपला अहवाल शासनास सादर केला व २९ जुलै २०२० रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन शैक्षणिक पद्धतीला मंजुरी देण्यात आली. इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आणि नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला. पहिले जुने सूत्र १० +२ +३ आणि नवीन सूत्र ५+३+३ +४ अंगणवाडी,बालवाडी पहिली-दुसरी पूर्व प्राथमिक स्टेज म्हणतात,३ री,४ थी,व ५ वी प्राथमिक स्टेज,६ वी,७ वी,८ वी माध्यमिक,९वी,१०वी,११वी,१२वी. उच्च माध्यमिक अशा प्रकारच नवीन सूत्र तयार करण्यात आलेले आहे. चार वर्षात संशोधनासह पदवी घेतलेला विद्यार्थी थेट पी.एच.डी.साठी पात्र ठरेल.या योजनेसाठी पात्र विद्यार्थीचार वर्षाची पदवी प्राप्त झाल्यानंतर केल्यानंतर अभ्यासक्रम प्रवेश बी.एड. चा अभ्यासक्रम चार वर्षाचा असेल. सहावीपासूनच कौशल्य विकास शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे

ISSN: 0030-5324
M.S. University of Baroda

विद्यार्थ्याला विषय निवडीचे स्वातंत्र्य आहे त्यामुळे विद्यार्थी त्याच्या आवडीचा विषय घेऊन तो शिक्षण घेऊ शकेल.

**पदवी अभ्यासक्रम तीन ते चार वर्षाचा राहील**
**टप्पा- पहिले** वर्ष प्रमाणपत्र मिळवून तुम्ही नोकरी करू शकता
**टप्पा- दुसरे** वर्ष डिप्लोमा पदविका मिळवून तुम्ही नोकरी करू शकता
**टप्पा- तिसरे** वर्ष डिग्री पदवी घेऊन तुम्ही नोकरी करू शकतात.
**चार वर्षे** संशोधनात्मक पदवी पूर्ण करण्यात करणारे विद्यार्थी पी.एच.डी.साठी पात्र असेल.
चार वर्षाचा संशोधनात्मक पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला तर त्याला एक वर्षात पदव्युत्तर पदवी मिळेल. होणार बारावी फक्त बोर्ड राहील दहावी बोर्डला महत्व राहणार नाही. विद्यार्थ्यांचा परीक्षेवरील तान कमी करण्यासाठी हा अभ्यासक्रम आहे दहावी बारावी नापास झाल्यानंतरही पुन्हा परीक्षा देता येईल.दोन सत्रात विद्यार्थी परीक्षा देवू शकेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०-**
**वैशिष्ट्ये-** १) बोर्डाच्या परीक्षेचा ताण कमी केला.
२) पाचवीपर्यंत शिक्षण हे मातृभाषेतूनच राहणार.
३) सहावीपासून कौशल्य शिक्षणावर भर दिला.
४) तिसरीपर्यंत मूलभूत अक्षर ओळख .
५)एकाच वेळी दोन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता येणार
६) उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्याला महाविद्यालयाची किंवा विद्यापीठाची पूर्व प्रवेश परीक्षा द्यावी लागणार आहे.
७) एम.फिल.बंद होणार
८)थेट पी.एच.डी. करता येणार.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० –**

**उद्दिष्टे-** **१)**बालवाडी ते माध्यमिक पर्यंतचे शिक्षण समान अभ्यासक्रम राहणार आहे. २०२०पर्यंत २) २०३० पर्यंत बालवाडी ते माध्यमिक पर्यंत १००% बालकांना शिक्षण देणार असे उद्दिष्ट आहे.३) शाळाबाह्य मुले शैक्षणिक प्रवाहात आणणे,४) खाजगी आणि सरकारी शाळेतील निकष एकच राहतील**.५)**व्यवसायिक शिक्षणावर भर**,६)**सहावीपासूनच व्यावसायिक शिक्षणाला सुरुवात होणार,७) जेव्हा विद्यार्थी बारावी उत्तीर्ण होईल त्यावेळी त्याच्याकडे एक व्यावसायिक शिक्षण पूर्ण झालेले असेल.८)विद्यार्थीचे मूल्यमापन हे विद्यार्थी स्वत,मित्र व शिक्षक मिळून मूल्यमापन करतील. पदवी घेत असताना मार्क्स नाहीत त्या ठिकाणी श्रेयांक आहे.A – Acadmic ,B- Bank ,C- Credit म्हणजेच ABC . येथे विद्यार्थ्याला गुण राहणार नाही तर त्या ऐवजी (श्रेयांक) अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट राहणार आहे. एखाद्या विद्यार्थी हा पुणे शहरातून शिकून तो मुंबईला शिक्षणासाठी गेला तर त्याच्या अकॅडमीक बँक ऑफ क्रेडिट मध्ये हे क्रेडिट जमा होतील आणि त्याला मुंबईला शिक्षण घेता येईल. या श्रेयंकामुळे विद्यार्थ्याला आपल्या आवडीने सवडीने आवडेल तिथे शिक्षण घेता येणार. विद्यार्थ्याचं बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास झाल्यानंतर तो विद्यार्थी आयटीआयच्या व्यवसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन आपले शिक्षण पूर्ण करणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेता येईल एखादा विद्यार्थी अभियांत्रिकी शाखेतील असेल तर त्याला कला शाखेतील संगीत हा विषय घेऊन त्याला शिक्षण घेता येईल.इथून पुढचे शिक्षण हे मल्टीडीसिप्लनरी असेल.मानव संसाधन मंत्रालयाचे नाव बदलून आता नविन धोरणा नुसार शिक्षण मंत्रालय असे करण्यात आले आहे.

**१)** रिसर्च युनिव्हर्सिटी - संशोधन विद्यापीठ २)अकॅडमी युनिव्हर्सिटी - शैक्षणिक विद्यापीठ, जनरल युनिव्हर्सिटी बहुभाषिक विद्यापीठ

**रिसर्च यूनिवर्सिटी**--किंवा संशोधनात्मक विद्यापीठ- या विद्यापीठात संशोधकाला संशोधनात्मक अभ्यासक्रम असेल.यामध्ये जे विद्यार्थी संशोधनात्मक कार्य करतील अशा विद्यार्थ्यांना या विद्यापीठात प्रवेश घेता येईल.आणि हे विद्यापीठ फक्त संशोधनात्मक कार्यावर कार्य करेल.

**अकॅडमी युनिव्हर्सिटी** -शैक्षणिक विद्यापीठ ज्या विद्यापीठात विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावयाचा आहे त्याला या अकॅडमी युनिव्हर्सिटी मध्ये शिक्षण घेतले.वेगवेगळ्या विषयामध्ये सखोल ज्ञान घ्यावयाचे आहे ते विद्यार्थी या विद्यापीठात प्रवेश घेऊन शिक्षण पूर्ण करतील.

**जनरल युनिव्हर्सिटी** :- बहुभाषिक विद्यापीठ- या विद्यापीठामध्ये विद्यार्थायिला अनेक बहु भाषा शिकण्यासाठी प्रवेश घेऊन विविध भाषा शिकण्याची संधी मिळेल. यामध्ये विद्यार्थ्याला अनेक भाषा शिकण्यासाठी या विद्यापीठात त्याला प्रवेश घेऊन त्याला विविध प्रकारच्या भाषा शिकता येतील असे २०२० चे शैक्षणिक धोरण आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०:-

**दोष:-**१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मुळे दुर्बल घटकांवर याचा फार मोठा परिणाम होणार आहे.
२) समाजातील गरीब श्रीमंतदरी निर्माण होईल कारण गरिबांना उच्च शिक्षण घेण्यासाठी पुरेसा पैसे नसल्यामुळे ते उच्च शिक्षण घेऊ शकणार नाहीत.त्यामुळे ते उच्च शिक्षणा पासून वंचित राहतील.
३) शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे श्रीमंत वर्ग श्रीमंत होईल गरीब हा गरीबच राहील

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मूल्यमापन--

सरकारने याची काटेकोरपणे व्यवस्थित अंमलबजावणी करून सर्वसामान्य लोकांना उच्च शिक्षण घेण्यासाठी दुर्बल घटकातील विद्यार्थांना फीस मध्ये सवलत देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे व मुख्य शिक्षण प्रवाहात आणावे.

ISSN: 0030-53
UGC CARE Group 1

ISSN: 0030-5324
M.S. University of Baroda

**निष्कर्ष--**मातृभाषेतून शिक्षण मिळाल्यामुळे विद्यार्थी हा त्याच्या शैक्षणिक प्रगतीत विकास करून तो उच्च पदावर जावू शकेल.

## संदर्भ

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०